श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई..

## महाप्रसादाचे लाडू बनवून पॅकिंगसहीत पुरवठा करण्याच्या मजूरी कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

## महाप्रसादाचे लाडू बनवून पॅकिंगसहीत पुरवठा करण्याच्या मजूरी कामाचा कंत्राट कालावधी १ सप्टेंबर, २०२५ ते ३१ ऑगस्ट, २०२६

### : ई–निविदा सूचना :

मंदिरातर्फे भाविकांना महाप्रसादाच्या स्वरूपात लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्याकरीता लाडू बनवून पॅकिंगसह पुरविण्याच्या मजूरी कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ई–निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | गुरूवार, दि. ३१/०७/२०२५ |
| निविदापुर्व बैठक दिनांक | गुरूवार, ०७/०८/२०२५, दुपारी ०२.०० वा. |
| ई–निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | शनिवार, २३/०८/२०२५, सायं ०५.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | सोमवार, २५/०८/२०२५, दुपारी ०२.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | सोमवार, २५/०८/२०२५, दुपारी ०३.०० वा. |
| स्थळ | श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

सही/–
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## महाप्रसादाचे लाडू बनवून पॅकिंगसहीत पुरवठा करण्याच्या मजूरी कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

---

## महाप्रसादाचे लाडू बनवून पॅकिंगसहीत पुरवठा करण्याच्या मजूरी कामाचा कंत्राट कालावधी १ सप्टेंबर, २०२५ ते ३१ ऑगस्ट, २०२६


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सूचना, वार, दिनांक वेळ | २ |
| २ | निविदेची किमंत, शुल्क, बयाना रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबतची माहिती | ३ |
| ३ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे | ४ |
| ४ | लाडू बनवून पॅकिंगसहित पूरवठा कामाचा तपशील | ५ |
| ५ | निविदाधारकाबाबतची माहिती ( फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर) | ६ |
| ६ | हमीपत्र (नमुना) | ७ |
| ७ | मागील तीन वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापालाचे पत्र | ८ |
| ८ | निविदाधारकाने खालीलप्रमाणे प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून तांत्रिक निविदेतील (Technical Bid) न्यासास सादर करावयाची कागदपत्रे. | ९ |
| ९ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) तपशील. | १० |
| १० | ई –निविदा मागविण्याबाबतची माहिती | ११ ते १२ |
| ११ | अटी व शर्ती | १३ ते १६ |

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र "अ"

| अ. क्र. | तपशिल | एका वर्षाकरीता होणारे अंदाजित काम | निविदेची किंमत/शुल्क (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | **महाप्रसादाचे लाडू** | २,५२,००० किलो | १२,०००/– | १,२५,०००/– |

टिप : महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रति किलो बेसनाच्या वापरावर कंत्राटदाराचे दर आधारीत असतील.

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | तपशिल | एका वर्षाकरीता होणारे अंदाजित काम | पतदारी दाखला (Solvency certificate) रक्कम (रु.) | अपेक्षित कमीत कमी तीन आर्थिक वर्षाची उलाढाल रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (इ) | (फ) |
| १ | **महाप्रसादाचे लाडू** | २,५२,००० किलो | | ५०,००,०००/– |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.

| अ.क्र. | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅंकेकडील पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / व्यवसाय परवाना |
| ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड |
| ५ | भविष्य निर्वाहनिधी प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ७ | कामगार राज्य विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | सेवाकर नोंदणी दाखला (GST Registration Certificate) |
| १० | राष्ट्रीयकृत/अनुसूचित बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ११ | आर्थिक वर्ष (२०२१–२०२२, २०२२–२०२३, २०२३–२४) आयकर विवरणपत्रे (ITR) |
| १२ | आर्थिक वर्ष (२०२१–२०२२, २०२२–२०२३, २०२३–२४) सेवाकर विवरणपत्रे (GSTR) |
| १३ | सन (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२५) या ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र.<br>**टिप – ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल ५० लक्षापेक्षा जास्त असावी.** |
| १४ | अनुभवाचा तपशील –देवस्थान/नामांकित संस्था/मिष्टान्न गृहे/नामांकित हॉटेल इ. पैकी एका ठिकाणी मिष्टान्न पुरवठा करण्याचा ३ वर्षाच्या अनुभवाचे कागदपत्र (बिल/पुरवठा आदेश/कार्यदिश यापैकी एक)) प्रती |
| १५ | हमी पत्र |
| १६ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation letter) |
| १७ | मुल्य निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ तांत्रिक निविदेत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे भरण्यात यावी. |

१. कंत्राट कालावधीमध्ये करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे.

**लाडू महाप्रसाद**

**अ)** महाप्रसादाचे लाडू बनविण्याकरीता बेसन, साखर, गाईचे तूप, बेदाणा, काजू तुकडा, वेलची, जायफळ पावडर, खाद्यरंग इ. कच्चा माल वापरण्यात येतो.

**ब)** महाप्रसादाचे लाडू बनविण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाचा वजनानुसार तपशील खालीलप्रमाणे–

| **महाप्रसाद लाडू** | |
|---|---|
| कच्चा माल | वजन |
| बेसन | ५० किलो |
| साखर | ९० किलो |
| गाईचे तूप | अंदाजे ६० किलो |
| काजू तुकडा | ५ किलो |
| बेदाणा | ५ किलो |
| वेलची | ०.२५० ग्रॅम |
| जायफळ पावडर | ०.२५० ग्रॅम |
| खाद्यरंग | ०.०६० ग्रॅम |
| **एकूण वजन** | **२१०.५६० किलो** |

**क)** खालीलप्रमाणे लाडू महाप्रसाद बनविण्यात येईल. (नमुद केलेले वजन व नग अंदाजे आहेत)

| अ.क्र. | कामाचा तपशील | वजन कि.ग्रॅ. (प्रति नग) | प्रमाण (प्रतिदिन अंदाजे नग) | प्रति ५० किलो बेसनाचे नग |
|---|---|---|---|---|
| १ | महाप्रसादाचे लाडू | ५० ग्रॅम | ४०००० नग ते ६०००० नग | ४,४०० नग |

**ड)** "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे वजनानुसार कच्च्या मालाचा वापर करुन न्यासाने विहीत केलेल्या प्रमाणात महाप्रसादाचे लाडू बनविण्यात येतील.

**(टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.)**

फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

**निविदाधारकाबाबतची माहिती**

**१) संस्थेचे/फर्मचे नांव/व्यक्तीचे नांव** :----------------------------------------------------

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

ब. दूरध्वनी क्र. :----------------------------------------------------

क. भ्रमणध्वनी (मोबाईल) :----------------------------------------------------

ड. फॅक्स क्र. :----------------------------------------------------

इ. ई—मेल :----------------------------------------------------

**२) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव (हुद्‌दयासह)** :----------------------------------------------------

अ. भ्रमणध्वनी (मोबाईल) :----------------------------------------------------

**३) सद्या कार्य सुरू असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता** :--------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

**४) सेवाकर नोंदणी क्र.** (GST Registration) :----------------------------------------------------

**५) आयकर नोंदणी पॅन क्र.** :----------------------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

(फर्म / कंपनीच्या लेटरहेडवर)

## हमीपत्र

दिनांक – / /२०२४

**प्रति,**
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

मी/आम्ही ---------------------------------------------------- खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार लाडू पॅकींगसहित बनविण्याचे काम आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये सेवाकर वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्वीकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालवधीत न्यासाने विहीत केल्यानुसार बॅक गॅरंटी देण्यास आम्ही बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी आमच्या काम करण्यासंदर्भात आमच्या विरूध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्वीकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

(सनदी लेखापाल यांच्या लेटरहेडवर)

**वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र**

दाखला देण्यात येतो की, मे. ..........................................................................

यांच्या व्यवसायाची वर्ष २०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२२–२०२३ | |
| २ | वर्ष २०२३–२०२४ | |
| ३ | वर्ष २०२४–२०२५ | |
| | **एकूण उलाढाल** | |

दिनांक :– / / २०२५

ठिकाण :–

सनदी लेखापालाची सही/चार्टर्ड अकाटंन्ट
(नांव/सही शिक्का)

नोंदणी क्रमांक :–

## निविदाधारकाने खालीलप्रमाणे प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून तांत्रिक निविदेतील (Technical) न्यासास सादर करावयाची कागदपत्रे.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची पावती प्रत |
| २ | बयाणा रक्कम (EMD) ऑनलाईन जमा केल्याबाबतची पावतीची प्रत |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) / ट्रेडिंग लायसेन्स |
| ४ | पॅन कार्ड नोंदणी प्रत |
| ५ | पी. एफ नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ६ | प्रोफेशनल टॅक्स नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ७ | कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत. |
| ८ | महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ प्रमाणपत्राची प्रत. |
| ९ | सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) |
| १० | राष्ट्रीयकृत/अनुसूचित बॅंकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) |
| ११ | आर्थिक वर्ष (२०२१–२०२२, २०२२–२०२३, २०२३–२४) आयकर विवरणपत्रे (ITR) |
| १२ | आर्थिक वर्ष (२०२१–२०२२, २०२२–२०२३, २०२३–२४) सेवाकर विवरणपत्रे (GSTR) |
| १३ | सन (२०२२–२०२३, २०२३–२०२४, २०२४–२५) या ३ वर्षाची मिळून आर्थिक उलाढाल नमूद असणारे सनदी लेखापाल (Charterd Accountant) यांचे प्रमाणपत्र. |
| १४ | हमी पत्र (पान क्र. वरील नमुन्यानुसार) |
| १५ | निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात नावासहीत प्राधिकार पत्राची प्रत. (Authorisation letter) |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

दिनांक – / / २०२५

# मुल्य निविदा (वाणिज्यिक Commercial) BOQ

निविदामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :------------------------------------------------

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------

निविदाधारकाचा कंपनी नोंदणी क्रमांक : ------------------------------------------------

सेवाकर नोंदणी क्र. (GST Registration) : ------------------------------------------------

| अ.क्र. | तपशील | लाडूचे वजन (प्रति नग) | प्रमाण (प्रतिदिन अंदाजे नग) | दर (कर वगळून) |
|---|---|---|---|---|
| १ | महाप्रसादाचे लाडू | ५० ग्रॅम | ४०००० नग<br>ते<br>६०००० नग | रु. .......... पै. ..........<br>(प्रति किलो बेसनाकरीता) |

टीप :

१. वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकतेनुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

२. वर नमुद मजूरी दरामध्ये न्यासाने विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वयंपाकगृहासह संपूर्ण मजल्याच्या साफसफाईचा खर्च समाविष्ट करून दर नमुद करण्यात आलेले आहेत.

३. महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रति किलो बेसनाच्या वापरावर कंत्राटदाराचे दर आधारीत असतील.

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती

१) लाडू बनवून पॅकिंगसहीत पुरविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता ई–निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

२) लाडू बनवून पॅकिंगसहीत पुरविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याकरीता कागदपत्रे तांत्रिक निविदमध्ये (Technical Bid) अपलोड करावी. तसेच तांत्रिक निविदेच्या (Technical Bid) प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी निविदा शुल्क (Tender Fee) रक्कम रु. १०,०००/– व बयाना रक्कम (EMD) रक्कम रू. १,२५,०००/– इतकी ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही/मिळणार नाही.

४) निविदा शुल्क रक्कम व बयाना रक्कम भरण्यासाठी ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

५) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसुचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. सदर दाखला एक वर्षाच्या निविदा मुल्याच्या अंदाजे ३०% रक्कमे इतका असावा.

६) स्थानिक सहकारी बॅंक, पतसंस्था इत्यादीचा धनाकर्ष व धनादेश ग्राहय धरला जाणार नाही.

७) ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व मुल्य निविदा (Bid Of Quotation) अशा दोन वेगवेगळया प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

८) ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, लाडू बनविण्यासंबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

९) महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठीच्या कामाची पाहणी करावयाची असल्यास महाप्रसाद विभागात सोमवार ते शनिवार या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भेट देऊ शकता.

१०) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी मंदिर न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

११) ई–निविदा भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह सेवाकर (GST) वगळून रक्कम भरावी.

# अटी व शर्ती

१) लाडू बनवून पॅकिंगसह पुरविण्याच्या कंत्राटाचा कालावधी हा कामाचे आदेश दिल्यापासून पुढील १ वर्षाकरिता वैध असेल. या कालावधीमध्ये कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, कामाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे.

२) ज्या कंत्राटदाराची निविदा मान्य होईल त्या कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत कंत्राटातील मजूरी रक्कमेच्या ५% अनामत रक्कम/ बॅक गॅरेंटी म्हणून एक वर्षासाठी मंदिर न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेसोबत ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फत सादर केलेली बयाना रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम बॅक गॅरेंटी म्हणून जमा करावी लागेल.

३) लाडू बनविण्याचे काम नियमित व वेळेतच होण्याकरीता निविदाधारकाचे कार्यक्षेत्र हे मुंबई असावे. त्यादृष्टीने निविदाकाराने मुंबईत कोठेही तत्सम काम केल्याची कागदपत्रे उदा. बिल/कार्यादेश/पुरवठा आदेश इ. पैकी एक सादर करणे आवश्यक राहील.

४) ई–निविदाधारक हिंदू असावा तसेच नामांकित देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट वगैरे ठिकाणी लाडू, मिष्टन्न बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

५) निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असावा. तसेच निविदाधारक संस्थेची कॅटरींग क्षेत्रात मागील ३ वर्षाची सरासरी ५० लक्षापेक्षा जास्त उलाढाल असावी.

६) महाप्रसादाचे लाडू बनविण्याकरीता लागणारा सर्व कच्चा माल, भांडी, (झारी सोडून), गॅस शेगडी/गॅस मंदिर न्यासातर्फे कंत्राटदारास पुरविण्यात येईल.

७) कंत्राट कालावधीत कंत्राटदाराने कच्च्या मालासह, स्वयंपाक गृहातील वस्तू व मालमत्ता काळजीपुर्वक तसेच जबाबदारीने वापरणे बंधनकारक असेल.

८) कंत्राट कालावधीमध्ये लाडू तयार करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे कच्च्या मालाचे, तयार मालाचे किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास मंदिर न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाई करून घेण्यात येईल. सदर रक्कम आपल्या देयकातून वजा करण्यात येईल.

९) कंत्राटदाराने संपुर्ण स्वयंपाकगृह, लाडू बनविण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व भांडी तसेच काम संपल्यानंतर संपुर्ण स्वयंपाक गृहाची (टेबल, भांडी, मोरी ई. ) धुणे / साफसफाई करणे बंधनकारक राहील.

१०) कंत्राट कालावधीत नमूद केलेल्या महाप्रसादाचे लाडू बनविण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात महाप्रसादाचे लाडू बनविण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

११) शनिवार, रविवार, मंगळवार, सार्वजनिक सुट्टी, उन्हाळी, दिवाळी, नाताळातील शालेय सुट्टया आणि अश्या गर्दीच्या दिवशी किंवा सण उत्सव (संकष्ट चतुर्थी, अंगारक संकष्ट चतुर्थी, भाद्रपद आणि माघी गणेशोत्सव) यावेळी लाडू महाप्रसादाची प्रचंड मागणी असते. अशा वेळी आठ दिवस अगोदर पासून जादा प्रमाणात लाडू महाप्रसाद बनविण्याचे काम करणे तसेच त्याकरीता लागणाऱ्या जादा कामगारांची व्यवस्था करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१२) कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा दाखला (Health Card), कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र म्हणून आधारकार्ड कंत्राटदाराने न्यासास देणे बंधनकारक राहील.

१३) कंत्राट कालावधीमध्ये स्वच्छता (Hygiene) विचारात घेऊन सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), हॅन्डग्लोज, शॉवर कॅप, अप्रॉन घालणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा सर्व खर्च कंत्राटदाराचा राहील.

१४) कंत्राट कालावधीत कार्यरत असणाऱ्या सर्व कामगारांची वैद्यकीय तपासणी प्रत्येक सहा महिन्याला करण्यात यावी. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा असून त्याबाबतच्या वैद्यकीय तपासणी अहवालाची एक प्रत महाप्रसाद विभागाला सादर करावी लागेल.

१५) कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास मंदिर न्यासास होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन देणे बंधनकारक राहील.

१६) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या सर्व कामगार व कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारची देणी, त्यांचा नोकरी हक्क व इतर बांधिलकी ही सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१७) कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने मंदिर न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१८) कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. जुन्या व नव्याने कंत्राटी कर्मचारी नियुक्त करतांना त्यांची पोलीस चारित्र्य पडताळणी करून घेणे संबंधित ठेकेदारावर बंधनकारक राहील.

१९) मान्य मजूरी दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने महाप्रसादाचे लाडू बनविण्याचे काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णत:/अंशत: बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

२०) महाप्रसादाचे लाडू बनविण्याचे दिलेले काम वेळेत न केल्यास, लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत मंदिर न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहिल.

२१) ई–निविदा मंजूर झाल्यावर कामाचे आदेश (Work Order) दिल्यानंतर १५ दिवसांचे आत करारनामा करून देणेसाठी रू. ५००/– चा गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर १५ दिवसांत समक्ष येवून करारनामा करून देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास कंत्राटदाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२२) कंत्राट आदेश व मजूरी देयकाची रक्कम मंदिर न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील

२३) कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये कंत्राटदार स्वत:च्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने त्यांची नियुक्ती करताना न्यासाच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित होणार/राहणार नाही.

२४) आपत्कालीन परिस्थितीत ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर न्यासाने राखून ठेवलेला आहे.

२५) या कामासाठी लावण्यात येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्रॉव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच कामगार भरपाई अधिनियमानुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. यापैकी कोणतीही जबाबदारी मंदिर न्यास घेणार नाही. कर्मचारी वेतन कायदा १९३६, कर्मचारी नुकसान भरपाई, कर्मचारी जबाबदार कायदा १९३८, कर्मचारी नियमित करणे व काढून टाकणेचा कायदा १९७९ नुसार वेळोवेळी झालेल्या कायदेशीर सुधारणा कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२६) किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत महाराष्ट दुकाने आस्थापना अधिनियम झोन नं. १ मधील किमान वेतन दरानुसार निविदाकाराने कर्मचाऱ्यांना वेतन देणे आवश्यक आहे.

२७) कंत्राट कालावधीत आपल्यामार्फत नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचा कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार कंपनीवर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार कंपनीमार्फत संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

२८) कामासाठी लावण्यात येणाऱ्या कामगारांस कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचप्रमाणे कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम तरतूदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी घेणे व सदर विमा पॉलिसीची प्रमाणित प्रत न्यासाकडे एक महिन्याचे आत दाखल करणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२९) निविदाकार यांचेकडील कामगारांना निवासाची व्यवस्था मंदिर न्यासाकडून पुरविली जाणार नाही.

३०) कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा मंदिर न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

३१) किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कर्मचाऱ्यांना वेतन तसेच त्या अनुषंगिक बाबीचे प्रदान करणे निविदाकारास आवश्यक राहिल.

३२) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३३) ई–निविदाधारकाने लाडू बनविण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे पूर्ण व्यवस्थापन नियोजन व संनियंत्रण ठेवणेसाठी एक पर्यवेक्षक नेमणे आवश्यक राहील. त्यांनी मंदिर न्यास कार्यालयाच्या व्यवस्थापक/पर्यवेक्षक/सहा.पर्यवेक्षक याचेबरोबर समन्वय साधला पाहिजे.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112
www.siddhivinayak.org
(Controlled by Govt. of Maharashtra)
admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


३४) मंदिर न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर दरमहा देयकाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

३५) ई–निविदेत नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम दिल्याचे आढल्यास कंत्राटदाराची निविदा रद्द करून त्याची मंदिर न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम जमा करण्यात येईल.

३६) मंदिर न्यासाने नेमुन दिलेली कामे ठरलेल्या वेळेत करत नसल्यास, कामात चालढकल करत असल्यास, अथवा समाधानकारक काम करत नसल्यास न्यासकडून कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राटदारास दिलेल्या कामाचे कंत्राट रद्द करेल व निविदाधारकाची बयाना रक्कम जप्त करणेत येईल.

३७) या कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

३८) कंत्राटदारास सदरचे काम मिळाल्यानंतर त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. सदर तरतूदींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास निविदाकारावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

३९) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार मंदिर न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

४०) ई–निविदामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९ ११११, ०२२–६२४९ १११२ वर किंवा खालील भ्रमणध्वनींवर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| श्रीमती वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी | ९९३०९४२४२८ |
| डॉ. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी | ९३२४९९९०९४ |
| श्री. मंगेश कुंटे, पर्यवेक्षक | ९७०२०२०३४२ |

Vpatil

(कार्यकारी अधिकारी)
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई.